अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# अन्न सुरक्षेच्या नावाने एवढा पोटशूळ का

काही वेळेला आपल्या समाजातल्या विचित्रपणाचा इतका विलक्षण अनुभव येतो की त्याविषयी खेद वाटल्याशिवाय राहत नाही. ज्या देशाला स्वातंत्र्य मिळून पासष्ट वर्षे झाली. त्या देशातल्या जवळपास चाळीस टक्के जनतेला दोन वेळचे अन्न मिळवण्याकरिता अनेक यातना सहन कराव्या लागतात, ही गोष्ट कोणालाही महत्त्वाची वाटू नये. पासष्ट वर्षानंतर का होईना कुठेतरी या चाळीस टक्के जनतेपैकी वीस टक्के लोकांच्या पोटात पुरेसे अन्न पुरवण्याची योजना पुढे येत असेल तर इतरांच्या पोटात पोटशूळ का उठावा? हे लक्षात येत नाही. माणसाला जगण्याचा हक्क असेल तर, हे जगणे सुसह्य होण्यासाठी पोटभर अन्न मिळणे हासुध्दा त्याचा हक्क ठरतो. तो हक्क देण्याचे काम अन्न सुरक्षा योजनेतून होत असेल तर ती योजना कमीत कमी खर्चामध्ये अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवण्याचा निस्वार्थी विचार का होत नाही, याचेही आश्चर्य वाटते. गेल्या काही दिवसांपासून या योजनेविरुध्द आक्रस्ताळेपणाने विरोध करण्याचे कारस्थान सुरू झाले आहे. या योजनेतून एक रुपयाचे स्वस्त धान्य देण्याकरिता सरकारला तीन रुपये पासष्ट पैसे खर्च येतो. म्हणून ही योजना देशाला दिवाळखोर बनवणारी आहे. अशा प्रकारचा डांगोरा पिटण्याचे काम व्यवस्थितपणे सुरू आहे. सामान्य माणसाला काही गोष्टी मिळायला लागल्या की, या लबाडांची कोल्हेकुई सुरू होते. कारण सरकारी योजना राबवण्याची मक्तेदारी फक्त आपलीच आहे. त्याचे सगळे फायदे मूठभर व्यापाऱ्यांना आणि राजकारण्यांनाच मिळाले पाहिजेत, असा गेल्या अनेक वर्षांचा पायंडा पडला आहे. त्याला या योजनेने तडाखा दिल्याबरोबर हे सगळे कोल्हे गल्लीपासून दिल्लीपर्यंत केकाटायला लागले आहेत. या योजनेत भ्रष्टाचार होईल, महागाई वाढेल, शेतकऱ्यांचे नुकसान होईल. अशी एक ना अनेक खुसपटे काढून तिला सुरुंग लावण्याचा उद्योग समजून उमजून सुरू आहे. ज्यावेळेला देशातल्या चाळीस टक्के जनतेला स्वस्तामध्ये थेट धान्य मिळेल, त्याचा बाजारपेठेवर निश्चितच परिणाम होईल. चौपट भावाने धान्य विकणाऱ्यांचे टाळके शेकले जाईल आणि या व्यापाऱ्यांची दलाली करणाऱ्या काही राजकारण्यांचेही धंदे डबघाईला जातील. आपले हे नुकसान टाळण्याकरता अन्न सुरक्षा योजनेचा बळी घेण्याचा योजनाबध्द प्रयत्न सुरू झालेला आहे. ही योजना कोणत्या सरकारने लागू केली किंवा कोणत्या राजकीय फायद्यासाठी लागू केली याच्याशी आम्हाला काही देणेघेणे नाही. आज गरिबाला अन्न सुरक्षेचा हक्क मिळत असेल तर तो त्याच्यापर्यंत यशस्वीपणे पोहचणे आम्हाला जास्त महत्त्वाचे वाटते.

## कर्जबुडव्यांविरुध्द का बोलत नाही

ज्या गरिबाला वर्षानुवर्षे त्याच्या या मुलभूत हक्कांपासून वंचित ठेवले गेले त्यातला पाच टक्के हक्क त्याला या निमित्ताने मिळत आहे. कारण ती योजना म्हणजे काही शंभर टक्के गरिबांना प्रामाणिकपणे अन्न पुरवेल असा आमचाही दावा नाही. त्यातही भ्रष्टाचार होईल. गरिबाच्या नावाने टनावारी धान्याचा पोबारा होऊ शकेल. पण म्हणून ऐंशी टक्के गरिबांचा हक्कच हिरावून घ्यायचा आणि योजनाच हाणून पाडायची हा कृतघ्नपणाही होता कामा नये. संतापजनक बाब तर अशी आहे की, आज जे लोक या स्वस्त धान्य योजनेला विरोध करीत आहेत. ते मात्र श्रीमंतांकडून बड्या भांडवलदारांकडून होणाऱ्या कर्जबुडवेपणाविरुध्द एक शब्दही बोलत नाहीत. सहा महिन्यांपूर्वीच रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरने एका जाहीर कार्यक्रमात देशातल्या राष्ट्रीयीकृत बँकांचे एक लाख कोटी रुपये बड्या भांडवलदारांनी बुडवल्याची धक्कादायक माहिती दिली होती. ती कर्जवसुली कशी करायची? असा मोठा प्रश्न बँकांपुढे उभा आहे. बँक कर्मचारी संघटनांनीसुध्दा या कर्जबुडव्यांविरुध्द पुराव्यानिशी आरोप करून दिवसाढवळ्या कशी लूट चालू आहे, याकडे सरकारचे लक्ष वेधले होते. परंतु गरिबांच्या योजनेविरुध्द इथून तिथून केकाटणाऱ्या या कोल्ह्यांची बड्या भांडवलादारांच्या दरोडेखोरीविरुध्द दातखिळ का बसावी? असा प्रश्न निर्माण होतो. एक रुपयाचे स्वस्त धान्य देण्याकरिता तीन रुपये पासष्ट पैसे खर्च येतो, असा काटेकोर हिशोब मांडणाऱ्या या कारस्थान्यांनी बड्या धेंडांच्या दरोडेखोरीचाही असाच हिशोब मांडून दाखववावा. हे एक लाख कोटी वसूल करण्याकरिता आतापर्यंत बँकांचे सव्वा लाख कोटींचे नुकसान झाले असेल. मग ही दिवाळखोरी कोणाच्या जीवावर केली गेली, हेही त्यांनी जरा तपासून पहावे. दुर्दैव असे आहे की, बड्या भांडवलदारांची, पैसेवाल्यांची ही लूट मुकाटपणे मान्य केली जाते. तिथे एकाचेही तोंड उघडत नाही. गरिबांना देण्याची वेळ आली की, यांच्या उखाळ्या-पाखाळ्या सुरू होतात. ही बनवेगिरी तितक्याच कठोरपणे मोडून काढली पाहिजे.

## कारस्थान्यांची कोल्हेकुई

ज्या पध्दतीने अन्न सुरक्षा कायद्याला विरोध केला जात आहे, ते पाहिल्यावर त्यामागे एक विशिष्ट गट कार्यरत असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने या योजनेमुळे ज्यांची दुकानदारी डबघाईला येणार आहे, ते सगळेच सरकारला दिवाळखोर ठरवण्यासाठी टपून बसलेले दिसतात. जर त्यांच्यामध्ये एवढा निस्वार्थीपणा असेल आणि सरकारच्या नुकसानीबद्दल त्यांना एवढी कणव वाटत असेल तर त्यांनी बड्या भांडवलदारांकडे अडकलेल्या कर्जाच्या वसुलीचा तगादा लावावा. त्यामुळे सरकारचे कसे नुकसान होत आहे हे स्वत:ही समजून घ्यावे आणि लोकांनाही सांगावे. खरे तर ही योजना निस्वार्थीपणे यशस्वी करण्याचे अभियान सुरू केले पाहिजे. ज्यांना ज्यांना समाजातल्या गरीब वर्गाविषयी संवेदना आहे. ज्यांना ज्यांना समाजातला गरीब सुखाने राहावा असे वाटत असेल त्यांनी त्यांनी ही योजना यशस्वी करण्यासाठी आपला वेळ आणि शक्ती दिली पाहिजे. सरकारी योजना आहे आणि ती सरकारनेच यशस्वी करावी. आम्ही फक्त त्यातले दोष दाखवण्याचे काम करू. असल्या भंपकपणाला अजिबात थारा मिळता कामा नये. कुठलीच सरकारी योजना प्रामाणिकपणे राबवली जात नाही किंवा राबवू दिली जात नाही. त्यामध्ये अजिबात दोष नसतील असेही आमचे म्हणणे नाही. परंतु दोषांचे भांडवल करून आपली दुकानदारी चालवत राहायचे आणि वर्षानुवर्षे वंचित राहिलेल्यांवर अन्याय करत राहायचे हे कुठेतरी थांबले पाहिजे. आम्हाला कोणत्याही सरकारची किंवा पक्षाची तरफदारी करायची नाही. गरिबासाठी, सामान्य माणसासाठी थोड्या फार चांगल्या गोष्टी घडत असतील तर त्याच्यापर्यंत पोहचल्या पाहिजेत, एवढाच आमचा प्रामाणिक हेतू आहे. त्याला विरोध करणाऱ्यांचे ढोंगही तितक्याच कठोरपणे उघडे पाडले गेले पाहिजे, असे आम्हाला वाटते.